(७२)

कर आकारणी व कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका,पुणे
जावक क्र.:-टिजीओ/
दिनांक :-३०/१०/२००२.

-:कार्यालय परिपत्रक:-

विषयः-भाडेकरु निघून गेल्याने भाडयाने दिलेल्या मिळकतीची पूर्वीची करपात्र रक्कम निश्चित करणेबाबत.

संदर्भः-१)मा.महा.आयुक्त यांचे कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र.मआ/टिजीओ/३३३५, दि.३१/१२/१९९९.

२) जा.क्र.टिजीओ/२०५१,दि.३/१०/२००२ चे मेसर्स इंडिया इंटरनॅशनल मल्टीव्हर्सिटी यांचे अर्जाबाबत सादर केलेल्या निवेदनावर मा.महा.आयुक्त यांनी ठराव क्र.६/१९५, दि.२८/१२/२००२ ने दिलेली मान्यता.

संदर्भ क्र.१ चे परिपत्रकान्वये भाडेकरी जागा खाली करुन गेल्यास सद्निकाधारकांकडून आर्थिक वर्षात ज्या महिन्यात अर्ज दाखल केला असेल त्या सहामाहीची मिळकतकराची संपूर्ण रक्कम भरुन घेण्यात येवून सद्निकाधारक सद्निकेचा वापर स्वतः राहणेसाठी करत असेल, तर पूर्वीची करपात्र रक्कम कायम करण्याचे धोरण मान्य करण्यात आले आहे. या धोरणांची कार्यवाही चालू आहे.

तथापी भाडेकरु सद्निका सोडून गेल्यानंतर सद्निकेचा ताबा सद्निकाधारक घेऊन करपात्र रक्कम कमी करावी, अशी मागणी करतात. प्रचलित धोरणानुसार त्या सहामाहीची कराची रक्कम सद्निकाधारकाकडून स्विकारुन पुढील सहामाहीचे एक तारखेपासून करपात्र रकमेत दुरुस्ती केली जाते.

तथापी या पध्दतीमुळे न्याय मिळत नाही अशी ब-याच सद्निकाधारकांची तक्रार असते. कारण एप्रिल/मे महिन्यामध्ये भाडेकरु जागा सोडून गेल्यानंतर व सद्निकाधारकाने अर्ज केल्यास सद्निकेची करपात्र रक्कम पुढील सहामाहीच्या एक तारखेपासून म्हणजेच दि.१ ऑक्टोबर पासून दुरुस्त करण्यात येते. महानगरपालिका अधिनियमातील शेडयूल चॅप्टर ८ मधील नियम क्र.२० मधील तरतूद स्पष्ट आहे. सदरची तरतुद विचारात घेऊन संदर्भ क्र.२ अन्वये, अशा प्रकारची खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मा.महा.आयुक्त यांनी संदर्भ क्र.२ चे ठरावानुसार मान्यता दिली आहे.

दिनांक १ ते १५ या मुदतीत जे सद्निकाधारक भाडेकरु जागा सोडून गेल्याचे कारणास्तव करपात्र रक्कम दुरुस्त करण्याकामी अर्ज करतील, अशावेळी त्या महिन्याच्या एक तारखेपासून व जे सद्निकाधारक दिनांक १६ ते ३० /३१ या मुदतीत अर्ज दाखल करतील, अशावेळी पुढील महिन्याची एक तारिख धरुन वार्षिक करपात्र रक्कम दुरुस्त करणेत यावी.

सदर धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे.

३०/१०

सह आयुक्त,
पुणे महानगरपालिका,पुणे

प्रतः-
मा.अति.महा.आयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका,पुणे — यांजकडेस माहितीसाठी सादर...

सहा.कर आकारणी व कर संकलन प्रमुख १ व २,
विभागिय निरीक्षक १ ते ७,
आकारणी विभाग प्रमुख